मंत्री
उच्च व तंत्रशिक्षण
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ०७/०६/२०२२

प्रिय विद्यार्थी/ मित्र- मैत्रिणी,

आज आपण शालेय शिक्षण पुर्ण करुन उच्च शिक्षणाच्या उंबरठ्यावर उभे आहात. उच्च शिक्षणाच्या असंख्य वाटा आपणासमोर आहेत. त्यातून आपल्या आवडीची, आपल्या ज्ञानाचा व आपल्या मधील कौशल्यास पैलू पाडून आपणास प्रगतीकडे अग्रेसर करणारी शिक्षणाची वाट आपणास निवडायची आहे. आपला ह्या क्षणीचा निर्णय आपल्या पुढील आयुष्याची दिशा ठरविणारा असतो. तथापि, या महत्वपूर्ण क्षणी आपली अवस्था संभ्रमाची असू शकते.

विद्यार्थ्यांना प्रगतीपथावर नेणाऱ्या बहुसंख्य विद्याशाखांपैकी तंत्र शिक्षण ही एक विद्या शाखा आहे. या विद्याशाखेतून आपणांस तंत्रज्ञ, अभियंता व उदयोजक होता येते व देश उभारणीत आपला खारीचा वाटा उचलता येतो.

१० वी नंतर कमी कालावधीचे तंत्रशिक्षण घेवून अभियंता होण्यासाठी व तद्‌नंतर नोकरी किंवा उद्योग उभारण्यासाठी तंत्रशिक्षणातील पदविका अभ्यासक्रम हा एक उत्तम पर्याय आहे. हा पदविका अभ्यासक्रम १० वी नंतर तीन वर्षाचा असतो व हा अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर आपणांस औद्योगिक क्षेत्रात रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध होतात. आपण सुपरवायझर ते ज्युनियर मॅनेजर पदापर्यंत जावू शकतो वा आपला स्वतःचा उद्योग सुरु करुन आपणांस उद्योजक सुध्दा होता येते. या अभ्यासक्रमाच्या विविध शाखा उपलब्ध असून त्यात मुख्यत्वे सिव्हील, इलेक्ट्रीकल, मेकॅनिकल, अणुविद्युत, कॉम्प्युटर, केमीकल या मुख्य शाखा आहेत. त्यांच्या इतर सर्व शाखा या मुख्य शाखेच्या अंतर्गत उपशाखा आहेत. आपण आपल्या आवडीप्रमाणे शाखा निवडून अभ्यासक्रमास प्रवेश घेवू शकतो. अभ्यासक्रम पुर्ण करण्यासाठी आपणास आपल्या पात्रतेच्या निकषानुसार विविध शिष्यवृत्ती शासनातर्फे देण्यात येतात, त्याचा सुध्दा तुम्हाला शिक्षण पुर्ण करण्यासाठी आर्थिक मदत होऊ शकते. पदविका शिक्षणानंतर पुढील शिक्षणासाठी आपणांस अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्षात पात्रतेनुसार प्रवेश घेण्याची संधीही उपलब्ध आहे. पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी तंत्रशिक्षण विभागाच्या dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट द्या व तेच संकेतस्थळ वापरून आपला प्रवेश गुणवत्तेनुसार निश्चित करा.

आपण तंत्रशिक्षणाची वाट धरुन उत्तम अभियंते व तांत्रिक बाबीत उच्चशिक्षित होऊन रोजगारक्षम / उद्योजक व्हावे, ही सदिच्छा।

आपल्या भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा।

(उदय सामंत)